# मंत्रिमंडळ निर्णय
## ९ मार्च २०१० (सह्याद्री)

### किमान वेतन वसुली दावे चालवण्याचे अधिकार सहाय्यक कामगार आयुक्त यांना प्रदान करण्याचा निर्णय

किमान वेतन कायद्याखाली वसुली दावे चालवण्याचे अधिकार सहाय्यक कामगार आयुक्त यांना प्रदान करण्याचा तत्वतः निर्णय घेण्यात आला.

किमान वेतन अधिनियम १९४८च्या कलम २०(१) नुसार वरील अधिकार देण्यात आला आहे.

या अधिनियमात सुधारणा करण्यासाठी प्रस्तावित सुधारणा / दुरूस्तीचे प्रारुप विधी व न्याय विभागाकडून तपासून विधेयकाचा मसूदा केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येईल.

---o---